**<u>नियमित दिवाणी दावा क्र.८०/२०२१ मधील नि.२८ वरील आदेश</u>.**

(CNR-MHAH23000215-2021)

१. अर्ज व म्हणणे पाहिले.

२. प्रतिवादी क्र.७ यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांना दाव्याकामी समन्सची बजावणी झाल्यानंतर हजर होवून कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतू प्रतिवादी क्र. ७ ही वयोवृध्द व अडाणी महिला तसेच सतत आजारी असल्यामुळे तिला न्यायालयात हजर राहून मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे, दावा सदर प्रतिवादी क्र.७ विरुध्द एकतर्फा चालवण्याचा आदेश झालेला आहे. परंतु वादी व प्रतिवादी यांचेदरम्यानचा वाद हा दावामिळकतीच्या वाटप, जाहीर ठराव व निरंतर ताकीदीकरीता असून प्रतिवादी क्र.७ हिची कैफियत दाखल करुन न घेतल्यास तिला तिची बाजु मांडणे अशक्य होईल. त्यामुळे तिचे कधीही व कशानेही न भरुन येण्याजोगे असे नुकसान होईल. सबब प्रस्तुत अर्ज.

३. वादी यांनी याच अर्जापाठीमागे म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादी क्र.७ हिला दिनांक १९/१२/२०२२ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. परंतू प्रतिवादी क्र.७ हिने जाणीवपूर्वक हजर न होता कैफियत देण्यास उशीर केलेला आहे. त्यामुळे, वादी यांनी सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.७ हिस नि.२१ वरील

पोहचपावती नुसार सन २०२२ मध्ये समन्सची बजावणी झाली असून देखील प्रतिवादी क्र.७ ही मुदतीत हजर न झाल्यामुळे तिचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक २४/०६/२०२५ रोजी दिला आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास साधारणपणे अडीच वर्षांचा विलंब झाला आहे. परंतु प्रस्तुत दावा हा वाटप, जाहीर ठराव निरंतर ताकीदीकामी दाखल केला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.७ ही आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र.७ हिला तिची कैफीयत व म्हणणे देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णीत न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तिची कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे, प्रतिवादी क्र.७ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश हा वादी यांना खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज (नि.क्र.२८) प्रतिवादी क्र.७ हिने वादी यांना खर्चाची रक्कम रुपये १५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2026.01.16 16:29:17 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १६/०१/२०२६.

**( ए. एन. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.